### बसवंत मधुक्रांती-२०२० | राज्यस्तरीय वेबिनार

### दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०२०

### महाराष्ट्रातील मधमाशी पालन : सद्य:स्थिती आणि संधी

# व्यापक विचारमंथनातून झाली 'मधु-लक्ष्मी'ची आराधना सफल

**पिकाची जोमदार गुणवत्ता**
**मधाची स्निग्ध रसवत्ता;**
**बेरोजगारांच्या हाती येईल**
**उद्यममार्गी अर्थसत्ता!**

- **मधमाशी पालन- संरक्षण**
- **परागीभवनातून पीकसंवर्धन**
- **मध उत्पादनातून वित्तलाभ**
- **आनुषंगिक घटकांनाही विक्रीमूल्य**

**'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.'** आयोजित तसेच **'पूर्वा केमटेक प्रा.लि.'** यांच्या सहकार्याने, **'मधमाशी पालन : महाराष्ट्रातील सद्य:स्थिती आणि संधी'** या विषयावरील राज्यस्तरीय वेबिनार दिनांक २८ ते ३० ऑक्टोबर २०२० दरम्यान संपन्न झाला. शेतीतील उत्पादनवाढ तसेच परागीभवनाकरिता मधमाशी पालन, मधमाशी पालनातून मिळणारे विविध पदार्थ, मधमाश्यांच्या विविध जातींचे संवर्धन आणि त्यासाठी असलेल्या शासनाच्या विविध योजना हे विषय वेबिनारच्या केंद्रस्थानी होते. **'बसवंत मधुक्रांती-२०२०'** या बीज-संकल्पनेच्या माध्यमातून 'दुसऱ्या हरितक्रांती'ची दिशा शोधणे; त्या दृष्टीने सर्वतोपरी व सप्रयोग प्रयत्न करणे हे विचारसूत्र प्रस्तुत नियोजनामागे होते.



बुधवार, दिनांक २८ ऑक्टोबर रोजी वेबिनारचे उद्घाटन **खादी ग्रामोद्योग आयोग, मुंबईचे संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. यशोवर्धन बारामतीकर** यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला **'पूर्वा कृषिदूत'** मासिकाचे **संपादक** तथा **'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.'चे टेक्निकल डायरेक्टर डॉ. भास्कर गायकवाड** यांनी वेबिनार



आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. तसेच तीन दिवस चालणाऱ्या या वेबिनारची माहिती देऊन, प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देऊन स्वागतही केले.

**'पूर्वा केमटेक'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार** यांनी



'ग्रीनझोन ॲग्रोकेम' तसेच 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'च्या माध्यमातून राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मधमाशी पालन प्रकल्पाची सुरुवात करताना, महाराष्ट्रातील शेतकरी आणि ग्रामीण युवकांना या उपक्रमातून जास्तीत जास्त फायदा करून देऊन; शेती उत्पादनवाढ तसेच रोजगार निर्मिती करण्यासाठी 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र' सदैव तत्पर राहील, अशी ग्वाही श्री. संजय पवार यांनी दिली.

राहुरीस्थित महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलसचिव तसेच **'पूर्वा कृषिदूत'** मासिकाचे **संस्थापक संपादक डॉ. बी.बी. पवार** यांनी 'मधमाशीद्वारे परागीभवन आणि शेती उत्पादनात वाढ' या विषयावर

सविस्तर मार्गदर्शन केले. निसर्ग आणि शेतीच्या दृष्टीने मधमाशीचे महत्त्व विशद करताना **डॉ. बी.बी. पवार**



म्हणाले की, दुसरी हरितक्रांती आता पारंपरिक कृषी निविष्ठा वापरून साध्य होणार नाही; त्यासाठी आता मधमाशीचा आधार घ्यावा लागेल. परागीभवनामध्ये मधमाशीचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे पीक उत्पादनात २५ टक्क्यांपासून ते ३०० टक्क्यांपर्यंत वाढ होते. यासाठी शेतकऱ्यांनी परागीभवनासाठी मधमाशीचा वापर वाढविला पाहिजे, अशी अपेक्षा डॉ. पवार यांनी व्यक्त केली.

नाशिकस्थित **'सुप्रकृती मधुशाला'चे संस्थापक**



**डॉ. तुकाराम निकम** यांनी शाळा तसेच महाविद्यालयांच्या माध्यमातून मधमाशी पालनाचा प्रसार करण्यावर भर द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. आजही समाजामध्ये मधमाशी पालनाबद्दल अज्ञान तसेच गैरसमज आहेत, त्यामुळे हा विषय मागे पडला आहे. मधमाशीचा प्रसार- प्रचार मोठ्या प्रमाणात करायचा असेल तर शाळा- कॉलेजमधील विद्यार्थीवर्गाला मधमाशीच्या बहुमोल कार्याबद्दल माहिती द्यावी. याद्वारे ही पिढी मधमाशी पालन उद्योगाचा विकास करण्यास मदत करेल. त्यातून त्यांना रोजगाराचे साधनही उपलब्ध होईल, असा आशावाद डॉ. निकम यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे **प्रमुख पाहुणे श्री. यशोवर्धन बारामतीकर** यांनी मधमाशी पालनाविषयीच्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. महाराष्ट्रामध्ये मधमाशी पालन व्यवसाय मागे आहे कारण अज्ञान, शास्त्रीय माहितीचा अभाव तसेच असंघटित रीतीने हा व्यवसाय केला जातो. शासनाच्या अनेक योजना असूनही पाहिजे त्या प्रमाणात त्यांचा लाभ घेतला जात नाही. यासाठी 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'सारख्या संस्थांनी पुढे येऊन आजच्या युवकांना प्रशिक्षित करून हा व्यवसाय पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच मधमाशी पालन करणाऱ्या सर्व व्यावसायिकांना एकत्रित करून संघटित प्रयत्न केले तर नक्कीच या व्यवसायाला फार मोठा वाव आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी महाराष्ट्रातील मधमाशी पालन करणारे उद्योजक, संस्था तसेच विस्तारक अशा विविध श्रेणींमधील एकूण आठ मान्यवरांना **'बसवंत मधुक्रांती- २०२० पुरस्कारा'**ने सन्मानित करण्यात आले. यावेळी पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी मनोगत व्यक्त करून अनुभव कथन केले. या कार्यक्रमामध्ये २०० पेक्षा जास्त मधुप्रेमींनी सहभाग घेतला होता.

वेबिनारच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजे दि. २९ ऑक्टोबर रोजी **कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड हिल, जि. पालघर**



येथील **कीटकशास्त्रज्ञ प्रा. उत्तम सहाणे** यांनी 'सातेरी मधमाश्यांची हाताळणी' या विषयावर मार्गदर्शन केले. परागीभवनासाठी सातेरी माश्या महत्त्वाच्या असून, त्यांच्या जास्तीत जास्त वसाहती तयार करून त्यांचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे झाले आहे. हे लक्षात घेता, मधपेट्यांमधील वसाहतींबरोबरच जंगलातील सातेरी मधमाश्यांच्या वसाहती गोळा करून, त्या मधपेट्यांमध्ये वाढविण्याच्या संदर्भातील सखोल व उपयुक्त माहिती श्री. सहाणे यांनी दिली.

**महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ,**



**महाबळेश्वरचे संचालक डॉ. डी.आर. पाटील** यांनी मधमाशी पालनासाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. खादी ग्रामोद्योग विभाग, खादी ग्रामोद्योग संचालनालय, नॅशनल बी बोर्ड यांबरोबरच कृषी विभाग, आत्मा, जिल्हा उद्योग केंद्र यासारख्या अनेक संस्थांच्या माध्यमातून मधमाशी पालनासाठी अनेक योजना राबविल्या जातात. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील त्या-त्या संस्थेशी संपर्क करण्याचे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

**डॉ. वाय.एस. परमार युनिव्हर्सिटी ऑफ हॉर्टिकल्चर ॲण्ड फॉरेस्ट्री, सोलन (हिमाचल प्रदेश)** येथील



**कीटकशास्त्र विभागप्रमुख डॉ. हरिश शर्मा** यांनी 'परागीभवनासाठी मधमाशी पालन' या विषयावर मार्गदर्शन केले. परागीभवनामुळे विविध प्रकारच्या पिकांचे उत्पादन कशा प्रकारे वाढते याचे मार्गदर्शन करताना डॉ. शर्मा म्हणाले की, आजच्या शेती पद्धतीमध्ये मधमाश्यांची संख्या कमी होत असल्यामुळे त्याचा पीक उत्पादन विशेषत: फळझाडांच्या उत्पादनावर मोठ्या प्रमाणात अनिष्ट परिणाम होत आहे. यासाठी सर्वांनी


मधमाश्यांच्या संवर्धनासाठी एकत्रित येण्याची गरज आहे.

**वर्धास्थित आग्या मधमाशीतज्ज्ञ डॉ. गोपाल पालिवाल** यांनी आदिवासी तरुणांना एकत्र करून, आग्या



मोहोळांच्या संवर्धनाद्वारे त्यांचा वापर परागीभवन तसेच पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी कसा करता येतो, याबद्दल अनुभवकथन केले. आपण ४००० पेक्षा जास्त आदिवासी तरुणांना आग्या मोहोळांपासून मध आणि इतर उत्पादनातून रोजगार मिळवून दिल्याची माहितीही त्यांनी दिली.

**खादी ग्रामोद्योग आयोग, भारत सरकारचे माजी संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. केशव कांबळे**



यांनी 'मधमाशी पालनासाठी विविध प्रकल्पांची उभारणी, अर्थशास्त्र आणि विक्री व्यवस्था' या विषयावर माहिती दिली.

**केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणेचे माजी विकास अधिकारी डॉ. धनंजय वाखले** यांनी मध आणि इतर पदार्थांची गुणप्रत तपासणी तसेच प्रमाणीकरणाबद्दल सविस्तर विवेचन केले.



**मायव्हेट चॅरिटेबल ट्रस्ट आणि रिसर्च सेंटर, कोल्हापूरचे डॉ. युवराज कागिनकर** यांनी मधमाश्यांच्या



पेट्यांद्वारे 'लाईव्ह फेन्सिंग' (सजीव कुंपण) करून, रानटी हत्तींपासून पिकांचे कशाप्रकारे संरक्षण करता येते याबद्दल माहिती दिली. त्यांनी राबविलेल्या विशेष उपक्रमाचा तपशीलही सांगितला. त्यांचा हा प्रकल्प 'एशियन एलिफण्ट हनी बी प्रोजेक्ट' या नावाने ओळखला जातो.

वेबिनारच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच ३० ऑक्टोबर रोजी पहिल्या सत्रामध्ये **पुणेस्थित राष्ट्रीय मधमाशी संशोधन आणि प्रक्रिया केंद्राच्या असिस्टंट डायरेक्टर डॉ. के. लक्ष्मी राव** यांनी मधमाशी पालनातून विविध पदार्थांचे उत्पादन कशा प्रकारे घेता येते याबद्दल सविस्तर माहिती दिली.



तसेच मधमाशी पालनातून मिळणाऱ्या उपयुक्त पदार्थांचा मानवी आरोग्यासाठी कशा प्रकारे फायदा करून घेता येईल, याबद्दल देखील मार्गदर्शन केले.

**खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबईचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बिपीन जगताप** यांनी 'मधमाशी पालनाची




महाराष्ट्रातील सद्य:स्थिती, त्यामधील अडचणी आणि भारतातील संधी' या विषयी विवेचन केले.

डॉ. जगताप यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील सर्व प्रांतांमध्ये मधमाशी पालनाला मोठा वाव आहे. मधुपालकांनी सातेरी माश्यांवर जास्त काम करण्यावर भर द्यावा; तसेच 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'सारख्या संस्थांनी पुढे येऊन या संदर्भात प्रशिक्षण द्यावे. अशा सामूहिक प्रयत्नांमधून मधु- व्यवसाय पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**गाझियाबाद, उत्तर प्रदेश येथील मधमाशी उद्योजक श्री. संजीव तोमर** यांनी 'राणीमाशीची निर्मिती, वसाहत विभाजन आणि एकत्रीकरण' याबद्दल मार्गदर्शन केले. या संदर्भात प्रत्यक्ष काम करून जास्तीत जास्त मधमाश्यांच्या चांगल्या वसाहती कशा करता येतील, याबद्दल स्वानुभवाधारित असा मौलिक तपशीलही त्यांनी दिला. केले.

**चंदिगड- पंजाब येथील श्री. मदन शर्मा** यांनी शाश्वत



मधमाशी पालनाच्या क्लस्टर निर्मितीची माहिती दिली. जास्तीत जास्त क्लस्टर केले तर हा व्यवसाय सोपा होतो, तसेच त्यामध्ये सातत्य राहात असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे क्लस्टर करणार असल्यास मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. समारोपप्रसंगी डॉ. भास्कर गायकवाड यांनी वेबिनारचा तीन दिवसांमधील गोषवारा सादर केला. श्री. संजय पवार यांनी अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याचा 'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' चा सातत्याने प्रयत्न राहील, असे सहर्ष आश्वासन दिले. उपस्थितांपैकी अनेकांनी हा वेबिनार अतिशय चांगल्या पद्धतीने आयोजित केल्याचे मत व्यक्त करून 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'च्या सर्व टीमचे कौतुक केले. तसेच यापुढेही असेच उपक्रम राबविण्यात यावेत, महिन्यातून कमीतकमी एक तरी ऑनलाईन कार्यक्रम घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

वेबिनारचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन 'पूर्वा केमटेक'च्या मानव संसाधन विभागाचे **श्री. रुपेश ठाकरे** यांनी केले. ■

# 'बसवंत मधुक्रांती-२०२०' पुरस्काराचे मानकरी




### विस्तारकार्य



**प्रा. उत्तम सहाणे**
३०१, गुलमोहर,
ओंकार रेसिडेन्सी, मासोली,
ता. डहाणू, जि. पालघर

### महिला श्रेणी



**सौ. रोहिणी पाटील**
नाडे नवारस्ता,
ता. पाटण,
जि. सातारा

### विदर्भ विभाग



**रामप्रसाद ठाकरे**
सिंदिविहिरी,
ता. कारंजा,
जि. वर्धा (महाराष्ट्र)

### कोकण विभाग



**श्री. प्रकाश पाटील**
विश्वनाथ सातेरी मधुमक्षी संशोधन,
ट्रेनिंग व विक्री केंद्र, मु. नागझरी,
पो. पोयनाड, ता. अलिबाग,
जि. रायगड

### संस्थात्मक श्रेणी



**श्री. विजय महाजन**
शिवसागर मध उद्योग,
तळेगाव दाभाडे,
ता. मावळ, जि. पुणे

### उत्तर महाराष्ट्र



**विष्णू जंगले**
जळगाव,
ता. जि. जळगाव,
(महाराष्ट्र)

### मराठवाडा विभाग



**श्री. ज्ञानेश्वर मलिले**
भगीरथ मध उद्योग,
शिरोळ (जातापूर),
ता. उदगीर, जि. लातूर.

### पश्चिम महाराष्ट्र



**श्री. राजू कानवडे**
अंबड,
ता. अकोले,
जि. अहमदनगर